# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः29.07.2025** **वारःमंगळवार**

---

नागपूरच्या दिव्या देशमुखला महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेचं अजिंक्यपद; कोनेरू हंपी उपविजेती

एकोणिसाव्या वर्षी ग्रँडमास्टर किताब मिळवणाऱ्या दिव्यावर देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव

लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवर चर्चेला प्रारंभ; पाकिस्ताननं आगळीक केली, तर ऑपरेशन सिंदूर पुन्हा सुरू होईल, संरक्षणमंत्र्यांचा इशारा

राज्य सरकार ॲप आधारित रिक्षा, टॅक्सी आणि ई बाईक सेवा सुरू करणार

आणि

राज्यातल्या अनेक धरणांमधून विसर्ग सुरू

**<u>दिव्यादेशमुख</u>**

फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत नागपूरच्या दिव्या देशमुखने ऐतिहासिक कामगिरी करत अजिंक्यपद पटकावलं आहे. जॉर्जियात बाटूमी इथं काल झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत टायब्रेक मध्ये दिव्याने भारताच्याच कोनेरू हंपीवर मात केली; हंपीला उपविजेतेपद मिळालं. अंतिम फेरीचे पहिले दोन सामने आणि काल सकाळी झालेला तिसरा सामनाही अनिर्णित राहिला, मात्र काल दुपारनंतर झालेल्या अटीतटीच्या सामन्यात कोनेरू हंपी हिच्यावर एका गुणानं मात करत दिव्यानं इतिहास रचला. या यशाबरोबरच दिव्यानं ग्रँडमास्टर हा किताबही मिळवला आहे.

वयाच्या १९व्या वर्षी हे उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या दिव्याबद्दल बोलताना ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे म्हणाले......

**<u>बाईट- अभिजीत कुंटे</u>**

दिव्याच्या या यशानंतर तिच्यावर देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्या आणि उपविजेत्या हंपीचं अभिनंदन केलं आहे. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत दोन्ही बुद्धिबळपटू भारताच्या असणं हे भारतातल्या अपार प्रतिभेचं प्रतीक असल्याचं राष्ट्रपतींनी नमूद केलं. तर दिव्याचं हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरेल, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह विविध मंत्री, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही दिव्याचं आणि कोनेरू हंपीचं अभिनंदन केलं आहे. दिव्याच्या यशाबाबत नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले

**<u>बाईट – मुख्यमंत्री</u>**

**<u>संसद-सिंदूर</u>**

ऑपरेशन सिंदूर स्थगित केलं आहे, संपलेलं नाही; पाकिस्तानने भविष्यात कोणतीही आगळीक केली, तर ऑपरेशन सिंदूर पुन्हा सुरू होईल, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काल लोकसभेत सांगितलं. ऑपरेशन सिंदूरवरच्या चर्चेला प्रारंभ करताना ते काल बोलत होते.

**<u>बाईट – राजनाथ सिंग</u>**

या कारवाईत भारताच्या सेनादलांनी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधले ९ दहशतवादी तळ उध्वस्त केले. यात १००पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याचा अंदाज आहे, असं राजनाथ सिंग म्हणाले. ऑपरेशन सिंदूरचं उद्दिष्ट दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करणं, दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवणं, आणि दहशतवादाबाबत भारताचं कठोर धोरण अधोरेखित करणं हे होतं, ऑपरेशन सिंदूरसाठी ठरवलेली राजकीय आणि लष्करी उद्दिष्टं पूर्ण झाल्यामुळे ही कारवाई थांबवली. कुणाच्या दबावामुळे शस्त्रसंधी केल्याचे आरोप पूर्णपणे चुकीचे आणि निराधार आहेत, असं त्यांनी स्पष्ट केलं.

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांच्यासह सत्ताधारी पक्ष आणि काही पक्षांच्या खासदारांनी या चर्चेत भाग घेतला. संरक्षणमंत्र्यांनी आपल्या भाषणात खूप माहिती दिली, मात्र पहलगाममध्ये दहशतवादी कसे घुसले, २६ पर्यटकांना त्यांनी गोळ्या घालून कसं मारलं, याची माहिती त्यांच्या बोलण्यात आली नाही, अशी टीका काँग्रेस खासदार

गौरव गोगोई यांनी केली. तर, पहलगामध्ये पर्यटकांवर हल्ला करणारे दहशतवादी अद्याप पकडले न गेल्यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी सरकारवर टीका केली.

**<u>राज्यसभा</u>**

राज्यसभेत मात्र कालही विरोधी पक्षांनी विविध मुद्द्यांवरून केलेल्या गदारोळामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. आज राज्यसभेत ऑपरेशन सिंदूरवर चर्चा सुरू होणार आहे.

**<u>ॲपआधारितरिक्षा</u>**

राज्य सरकार ॲप आधारित रिक्षा, टॅक्सी आणि ई बाईक सेवा सुरू करणार असल्याचं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल सांगितलं. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्यानंतर हे ॲप कार्यान्वित केलं जाईल. लवकरच हे ॲप तयार होईल. यंत्रणेत पारदर्शकता ठेवण्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा यात समावेश असेल; यामुळे राज्यातल्या लाखो तरुणांना रोजगार उपलब्ध होईल, असं सरनाईक म्हणाले.

**<u>श्रावणीसोमवार</u>**

पहिल्या श्रावणी सोमवारनिमित्त काल राज्यातल्या विविध शिवमंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. नाशिकमध्ये त्र्यंबकेश्वर इथं श्रावणी सोमवारी गोदावरीचं उगमस्थान असलेल्या ब्रह्मगिरीला प्रदक्षिणा घालण्याची पध्दत आहे; त्यासाठी  देखील भाविकांनी काल गर्दी केली होती.

राज्यात सर्वत्र आज नागपंचमीचा सण प्रतिकात्मक पद्धतीनं पण उत्साहात साजरा होत आहे. सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात नागपंचमीला मोठी यात्रा भरते; ही यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनानं आवश्यक तयारी केली आहे.

**<u>इंट्रो</u>**

**<u>शैक्षणिकधोरण</u>**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ला आज पाच वर्ष पूर्ण होत आहेत. समावेशक, विद्यार्थी केंद्रित आणि भविष्यवेधी शिक्षण व्यवस्था तयार करण्याच्या दृष्टीनं या शैक्षणिक धोरणाची आखणी करण्यात आली आहे. या महत्त्वाकांक्षी शैक्षणिक धोरणाबाबत पुण्यातील भाषातज्ञ, प्राध्यापक डॉक्टर माधुरी गोखले आकाशवाणीशी बोलताना म्हणाल्या .......

बाईट – गोखले

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेनं नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता तिसरी ते दहावीसाठी शालेय शिक्षण अभ्यासक्रमाचा प्रस्तावित मसुदा तयार केला आहे. हा मसुदा www.maa.ac.in या संकेतस्थळावर सर्वांना पाहता येईल; यावर सामान्य जनतेकडून सूचना आणि अभिप्राय मागविण्यात आले आहेत. येत्या 27 ऑगस्टपर्यंत अभिप्राय नोंदवता येणार आहेत.

**<u>निधन</u>**

ज्येष्ठ लेखिका, कादंबरीकार शुभांगी भडभडे यांचं काल सकाळी नागपूर इथं निधन झालं. त्या ८० वर्षांच्या होत्या. चरित्रात्मक कादंबऱ्या, कथासंग्रह, आणि वैचारिक लेखन करत त्यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुभांगी भडभडे यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<u>पाऊस</u>**

राज्याच्या काही भागात आता पावसाचा जोर कमी झाला असला तरी धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्यानं मोठ्या प्रमाणावर विसर्ग करण्यात येत आहे. पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत ९० टक्क्यांपेक्षा जास्त पाणी साठा झाला असून धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

सातारा जिल्हयात पावसाचा जोर कमी झाल्याने कोयना, कण्हेर, धोम, धरणातील विसर्ग कमी करण्यात आला आहे.

कोयना आणि वारणा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असल्यानं सांगली जिल्हयातील बहे, नागठाणे, डिग्रज,सांगली, म्हैशाळ असं पाच बंधारे कृष्णा नदीच्या पाण्याखाली गेले आहेत.

नाशिक जिल्हयाच्या काही भागात कालही पावसाचा जोर होता; यामुळे गंगापूर, कडवा, दारणा, आळंदी, वाघाड, वाकी आदी धरणांमधून विसर्ग वाढवण्यात आला आहे.

धुळे जिल्ह्यात पांझरा, मालनगाव आणि जामखेडी प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. अक्कलपाडा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु असल्याने धुळे शहरातील फरशी पुल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या २४ तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे, विदर्भ आणि मराठवाड्यातही काही ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.